अमेरिकेत विशेषतः न्यू जर्सीमध्ये तुम्ही राहात असाल तर मराठी कार्यक्रमांची रेलचेल असते. मग पाहता पाहता आठवडे, महिने, वर्षे कशी निघून जातात हे कळत नाही. मराठी मंडळीही भरपूर असल्याने आवडीप्रमाणे ग्रूप जमतात.

माझही थोडस असच झालं. न्यू जर्सीच्या बाहेर काय चाललंय याचा कधी फारसा विचार केला नाही. परंतु २००९ साली बृहन महाराष्ट्र मंडळाची अध्यक्षा झाले व क्षणार्धात "हे विश्वचि माझे घर" झाले. केवळ उत्तर अमेरिकेतीलच नव्हे तर जगातील इतर खंडामधील मराठी मंडळांची ओळख होऊ लागली. आपल्याकडे जसे बृहन महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन दर दोन वर्षाने होते तसेच युरोप मध्येही ही प्रथा चालू आहे. गेल्या वर्षी त्यांच्या समितीशी बोलल्यावर असे कळले की २०१० चे अधिवेशन झुरिक स्वित्झर्लंड मध्ये आहे. लगेचच निर्णय घेतला की आपण उपस्थित राहायचे. त्यात २ हेतू होते. एक म्हणजे उत्सुकता होतो की युरोपचे संमेलन कसे करतात व दुसरा हेतू म्हणजे युरोपातील मराठी लोकांची ओळख होईल. संमेलनाच्या समितीने मला Board of Adviser केले त्यामुळे सर्वांशी e-mail ने बोलणे सुरु झाले.

अखेर २२ जुलै तारीख उजाडली व मी आणि सुहास झुरिकला जाणार्या विमानात बसलो. शुक्रवारी सकाळी २३ जुलै रोजी पोहोचलो. एअर पोर्ट उतरल्यावर ट्रेन घेऊन स्विस हॉटेलला पोहोचलो. प्रवासाच्या आधी संमेलनाच्या कार्यकारिणीने व्यवस्थित माहिती दिल्याने हॉटेल सापडायला काहीच त्रास पडला नाही. हॉटेलच्या दालनात मराठी मंडळींची, भारतातून आलेल्या काही कलाकारांची लगबग चालू होती. कार्यकारिणीच्या लोकांनी अतिशय आपुलकीने स्वागत केले. वातावरण एकदम मोकळे, informal होते. थोडा वेळ विश्रांती घेऊन आम्ही ४ वाजता उदघाटन समारंभासाठी सज्ज झालो. स्विस हॉटेलमध्येच एक मोठ्या दालनात स्टेज उभारले होते. सुमारे ४०० लोक उपस्थित होते. त्याच्याच शेजारी २ मोठ्या खोल्या जेवण्यासाठी होत्या. सर्वप्रथम श्री राज ठाकरे यांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले. मराठी माणसांची महाराष्ट्रातील स्थिती, त्याविषयी राज ठाकरे यांचे प्रयत्न, त्यांच्याविषयीचे इतरांचे गैरसमज तसेच मुंबईतील कमी होणारी मराठी लोकांची संख्या यावर कारणमीमांसा केली. श्री ठाकरे यांच्याबरोबर डॉ. प्रकाश व डॉ. मंदा आमटे , श्री सुनील गावस्कर आणि आमदार नितीन सरदेसाई यांचाही सत्कार करण्यात आला. त्यानंतर पुण्याहून आलेल्या कलाकारांचा नाचाचा कार्यक्रम झाला. नटरंग मधील लावण्या सोनाली कुलकर्णीने सादर केल्या. प्रत्येक कलाकाराचे अविर्भाव, नाचाचा वेग व कौशल्य इतके सुंदर होते की प्रेक्षकांनी शिट्या, टाळ्या व once more चा गजर केला. नाचानंतर "लग्नानंतर काय" हे छोटी नाटिका युकेच्या ग्रुपने सादर केली. रात्री जेवणानंतर अशोक पत्की यांचा गायनाचा प्रवास यावर आधारित अतिशय सुंदर कार्यक्रम झाला. स्वप्नील बांदोडकर व शैलजा सुब्रम्हन्यं यांनी गाणी म्हणली.

दुसर्या दिवशी सकाळी Manchester Liverpool मराठी मंडळाने "वसंत ऋतू" हा वसंत देसाई, वसंत प्रभू आणि वसंत पवार या ३ वसंताच्या गाण्यांवर एक अतिशय सुंदर कार्यक्रम सादर केला. गाण्यांबरोबर त्या त्या चित्रपटांच्या फिती दाखवल्यामुळे मन भूतकाळात रमून गेले. दुपारी झुरिक लेकवर एक बोटीतून सर्वांनी सहल केली. युरोपचे नंदनवन असलेल्या स्वित्झर्लंडच्या निसर्ग सौंदर्याचा सर्वांनी मनसोक्त आनंद लुटला. परत आल्यावर संध्याकाळी आमटे दाम्पत्याची मुलाखत, श्री भीमराव पांचाळे यांच्या मराठी गझलांचा कार्यक्रम तसेच युकेच्या ग्रुपचा गाण्याचा कार्यक्रम झाला. रात्री श्री विजय केंकरे दिग्दर्शित वा गुरु या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग झाला. दिलीप प्रभावळकर व अतुल परचुरे यांचा प्रभावी अभिनय, सर्व कलाकारांनी त्यांना दिलेली जोड, नर्म विनोद वा उत्तम संवाद यामुळे नाटक सर्वाना आवडले. रात्री उशिरा सुनील गावस्करांची खुमासदार मुलाखत आणि त्यावर कळस म्हणजे मध्यरात्री सर्वाना खिलवलेली भेल. यामुळे वातावरण अगदी छान झाले होते.

संमेलनाचे जेवण बनवण्यासाठी खास अलिबागहून Radisson हॉटेलचा आचारी आला होता. त्याने अतिशय चविष्ट मराठी पदार्थ (शाकाहारी आणि मांसाहारी) तयार केले होते. कोतीम्बीरीच्या वड्यांपासून ते उकडीच्या मोदकापर्यंत पदार्थ

करून त्याने मराठी माणसांचा आत्मा तृप्त केला. चहासुद्धा खास युरोपिअन पद्धतीने कपबशीत तसेच भारतातून फराळाचे पदार्थ मागवले होते. स्विस हॉटेल चे कर्मचारी उत्साही व वक्तशीर असल्याने कुठेही गोंधळ झाला नाही.

सर्व लोकांशी बोलताना मला जाणवले की त्यांना अमेरिकेत होणार्या बृहन महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाबद्दल खूप उत्सुकता होती. सर्वांना एक प्रकारची आत्मीयता होती त्यामुळे माझ्या खूप ओळखी झाल्या. मी उपस्थितांना बृ.महाराष्ट्र मंडळाच्या कामकाजाची माहिती दिली व अधिवेशनाला यायचे आग्रहाचे आमंत्रण केले. मला खात्री आहे युरोपमधून बरीच मंडळी पुढच्या वर्षी शिकागोला येतील. या संमेलनांचे वैशिष्ठ म्हणजे एकावेळी अनेक समांतर कार्यक्रम नव्हते त्यामुळे सुटसुटीतपणा वाटला. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, हॉलंड, स्पेन, जर्मनी वगैरे देशातून मंडळी आली होती पण सर्वात जास्त लोक हे इंग्लंडचे होते. अमेरिकेहून ९ जण आले होते.
लहान मुल आपापसात स्विस जर्मन भाषेत छान बोलत होती पण त्याचबरोबर मराठी अतिशय उत्तम बोलत होती. आईवदलांशी त्यांचे बोलले मराठीतूनच होत असणार. तरुण मुलांचा मात्र अभाव जाणवला. ४०० लोकांची उपस्थिती म्हणजे संमेलनाच्या समितीने केलेले उत्तम मार्केटिंग हेच त्याचे कारण.

रविवारी सकाळी कीर्तन, शिकागोच्या दिलीप थत्ते यांचे 7 Stars of Hinduism हे presentation तसेच "गाठ आहे सत्याशी" ही मकरंद अनासपुरे आणि प्रशांत दामले यांची नाटिका ई. कार्यक्रम झाले. आम्ही पुढे स्वित्झर्लंड आणि इटली बघायचे ठरवल्याने सर्वांचा निरोप घेऊन लगेचच निघालो. सर्व अधिवेशनांमध्ये मनाची जी परिस्थिती होते तशीच तिथेही झाली. मनाला हुरहूर वाटते आणि छे फारच लौकर ३ दिवस संपले असे मनात येते. जगाच्या पाठीवर तुम्ही कुठेही राहा पण मराठी मनाला भावणार्या गोष्टी सारख्याच. आता जुलै २०१२ चे अधिवेशन कार्डिफ, वेल्स मध्ये आहे. संमेलन आणि पर्यटन याचा समन्वय गाठण्यासाठी आपण जरूर बेत ठरवा.

धन्यवाद
सौ. माधुरी जोशी